---

# यवतमाळ जिल्हा पोलीस राजपत्र
# दिनांक - 07/09/2020

राजपत्रातील ०६ भाग –

| | |
|---|---|
| भाग – ०१ | **बदली /नेमणुक /पदोन्नती** |
| भाग – ०२ | **रजा** |
| भाग – ०३ | **वेतन/भत्ते / रोखिकरण** |
| भाग – ०४ | **बक्षिस / मानधन** |
| भाग – ०५ | **शिक्षा/ निलंबन / सेवानिवृत्ती** |
| भाग – ०६ | **प्रशिक्षण व इतर** |

---

मा. पोलीस अधीक्षक,
यांचे मान्यतेनुसार

( एम. एम. बागवान )
पोलीस उप अधी.(मुख्या)
पोलीस अधीक्षक यवतमाळ करीता

**प्रति,**

<u>प्रभारी अधिकारी, सायबर सेल यवतमाळ</u> :– सदरचे गॅझेट हे जिल्हा पोलीस दल यवतमाळ चे www.yavatmalpolice.gov.in या अधिकृत संकेत स्थळावर GAZETTE या मथळयाखाली प्रसिद्ध करावे. तसेच जिल्हयातील प्रत्येक पोस्टे./उपविपोअ./अधिकारी यांचे E - Mail वरती पाठवावे.

# भाग १ - बदली /नेमणुक /पदोन्नती

क्रमांक:-पोअय/पलि-२/मुदतपुर्व बदली/वश्रेलि-कार्यमुक्त/२०२० 7357 यवतमाळ, दिनांक

-7 SEP 2020

**आ दे श**

मा.विशेष पोलीस महानिरीक्षक, अमरावती परिक्षेत्र, अमरावती यांचे आदेश क्रमांक अप/कक्ष-४-अ/मुदतपुर्व बदली/वश्रेलि-कश्रली/२०२०/२८५२, दिनांक- १०/०८/२०२० अन्वये कनिष्ठ श्रेणी लिपीक श्री.गोपाल पुरुषोत्तम मेंढे यांची पोलीस अधीक्षक कार्यालय, यवतमाळ ते प्राचार्य,पोलीस प्रशिक्षण केंद्र कार्यालय अकोला अशी विनंतीवरुन, स्वखर्चाने बदली करण्यात आल्याने त्यांना त्यांचे बदली ठिकाणी हजर होणेकामी दिनांक- ७ /०९/२०२० रोजी म. नंतर या आस्थापनेवरुन कार्यमुक्त करण्यात येत आहे.

त्यांची बदली ही विनंतीवरुन व स्वखर्चाने असल्याने पदग्रहण अवधी व प्रवासभत्ता देय राहणार नाही.

**( एम.राज कुमार )**
पोलीस अधिक्षक,यवतमाळ

प्रति,

१.श्री.गोपाल पुरुषोत्तम मेंढे ,कनिष्ठ श्रेणी लिपीक, पोलीस अधीक्षक कार्यालय यवतमाळ.

**प्रत सविनय सादर ,**

**मा.विशेष पोलीस महानिरीक्षक, अमरावती परिक्षेत्र अमरावती**

प्रत सस्नेह अग्रेषित :- प्राचार्य,पोलीस प्रशिक्षण केंद्र अकोला

प्रतीलीपी :अ.पो.अ./पोउपअधि(मुख्या.)/का.अ./सर्व प्रलि /लघुलेखक/ वेतन लिपीक-२/
वि.चौ.लि./डीपीजी लिपीक/प्रवास भत्ता लिपीक

# भाग २ - रजा

क्र.पोअय/पलि-२/अ.रजा/आयशा / 7364 /२०२० 7 SEP 2020 यवतमाळ ,दि.

<u>आदेश</u>

श्रीमती.आयशा अ रब ,कश्रेली यांना त्यांचे मुलीची प्रकृत्ती ठिक नसल्याने त्यांना **दि.७ /९/२०२० ते ११/९/२०२० पर्यंत एकुण ९** दिवस अर्जीत रजा शासकिय सुटीला जोडुन मुख्यालय सोडण्याचे परवानगी सह मंजूर करण्यात येत आहे,त्यांचे रजेच्या काळात त्यांचे कडे असलेल्या कार्यासनास अतिरीक्त कार्यभार श्रीमती लता वदझडे, कश्रेली यांच्या कडे सोपविण्यात यते आहे.

**(मा.पोलीस अधीक्षक यांचे मान्यतेने)**

(सुशिला पवार )
प्र.कार्यालय अधीक्षक
पोलीस अधीक्षक यवतमाळ
करीता

प्रति,

१. श्रीमती आयशा अ रब कश्रेली पो.अ.कार्यालय यवतमाळ

२. श्रीमती लता वदझडे कश्रेली पो.अ.कार्यालय यवतमाळ

प्रत : पोउअधीक्षक मुख्यालय यवतमाळ /प्रमुख लिपीक आस्थापना शाखा/डिपीजी लिपीक

7331

*क्रमांक.:पोअय/प्रलि-८०-सी/७ वा वेतन आयोग/सुधारित वेतन निश्चिती-सपोनि/ /२०२०, दि.* 7 SEP 2020

**आदेश**

महाराष्ट्र शासन वित्त विभाग, शासन निर्णय क्र.वेपूर–2018/प्र.क्र.44/सेवा–9, दि.01 जानेवारी, 2019, महाराष्ट्र नागरी सेवा (सुधारित वेतन) नियम–2019 व शासन अधिसूचना वित विभाग क्रमांक वेपूर 2019/प्र.क्र. 1/सेवा–9, दि.30 जानेवारी 2019 व शासन परिपत्रक क्र.वेपूर–2019/प्र.क्र.8/सेवा–9, दि.20/02/2019 अन्वये महाराष्ट्र राज्यातील अधिकारी व कर्मचारी यांना 7 व्या वेतन आयोगानुसार सुधारित वेतन संरचना दिनांक 01 जानेवारी 2016 पासून लागू करण्यात आलेली आहे. उपरोक्त नमूद शासन निर्णय/परिपत्रकात देण्यात आलेल्या सूचनांनुसार खालील नमूद पोलीस अधिकारी यांची दि.01/01/2016 पासून सुधारित वेतन मॅट्रिक्समध्ये वेतननिश्चिती करण्यात येत आहे.

**वेतन संरचना :–**

| पदनाम | विद्यमान वेतन संरचना–वेतनबॅण्ड | सुधारित वेतन संरचना–वेतन मॅट्रीक्स |
|---|---|---|
| सहायक पोलीस निरीक्षक | 9300–34800 ग्रेड वेतन–4400 | 41800–132300 **(S-15)** |
| पोलीस उप निरीक्षक | 9300–34800 ग्रेड वेतन–4300 | 38600–122800 **(S-14)** |

**1) श्रीकांत माधवराव इंगोले, सहायक पोलीस निरीक्षक**

| 6 व्या वेतन आयोगातील वेतन (दिलेले वेतन) | | | दि.01/01/2016 चे मूळ वेतन–11930+4300=16230<br>16230 **x** 2.57=41711.1<br>वेतन मॅट्रीक्स **(S-14/L-4)** नुसार दि.01/01/2016 चे वेतन–42200 (देय वेतन) | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| वेतनवाढ दिनांक | वेतन | ग्रेड वेतन | वेतनवाढ दिनांक | वेतन | वेतनवाढीची रक्कम | एकूण वेतन |
| 01/01/2016 | 11930 | 4300 | 01/01/2016 | 42200 | --- | 42200 |
| 01/07/2016 (वे.वाढ रोखण्याची शिक्षा) | 12420 (काल्पनिक वेतन) | 4300 (काल्पनिक) | 01/07/2016 (वे.वाढ रोखण्याची शिक्षा) | 42200 (काल्पनिक वेतन) | 1300 (काल्पनिक) | 43500 (काल्पनिक) |
| 05/06/2017 पोउपनि ते सपोनि पदोन्नती | 12420 (काल्पनिक वेतन) | 4400 (काल्पनिक) | 05/06/2017 पोउपनि ते सपोनि पदोन्नती वेतन मॅट्रीक्स **S-15/L-3** | 44400 (काल्पनिक वेतन) | --- | 44400 (काल्पनिक) |
| | | | 01/07/2017 (पदोन्नती पूर्वीचे पदात नियमित वेतनवाढ– वेतन मॅट्रीक्स **S-14/L-6**) | 43500 | 1300 | 44800 |
| | | | 01/07/2017 पदोन्नतीची वेतनवाढ वेतन मॅट्रीक्स **S-14/L-7** | 44800 | 1300 | 46100 |
| 01/07/2017 कनिष्ठ पदात वेतन वाढ | 12930 (काल्पनिक वेतन) | 4300 (काल्पनिक) | 01/07/2017 सपोनि पदाचे निश्चित देय वेतन वेतन मॅट्रीक्स **-S-15/L-** 5 | 47100 | --- | 47100 |
| 01/07/2017 विकल्पानुसार सपोनि पदात वेतननिश्चिती | 13450 | 4400 | | | | |
| 01/07/2018 | 13990 | 4400 | 01/07/2018 | 47100 | 1400 | 48500 |
| 01/07/2019 | 13990 | 4400 | 01/07/2019 | 48500 | 1500 | 50000 |
| **या कार्यालयाचे आदेश दि. दि.१५/०३/२०२० अन्वये दि. १५/०३/२०२० पासून निलंबित करण्यात आले.** | | | | | | |

टिप–1) 01 वर्ष वेतनवाढ रोखण्याची शिक्षा (पो.अधीक्षक, सोलापूर ग्रामिण यांचे आदेश दि.02.08.2015)

2)दि.05.06.2017 रोजी पोलीस उप निरीक्षक ते सहायक पोलीस निरीक्षक पदी पदोन्नती झाली.

वरीलप्रमाणे दि.01/07/16 ची वार्षिक वेतनवाढी रोखण्याची शिक्षा (पुढील वेतनवाढीवर परिणाम न करणारी) असल्याने दि.01/07/16 ते 30/06/2017 पर्यंतची थकबाकी देय राहणार नाही. सदर कालावधीत त्यांना रू.42200/–प्रमाणेच वेतन देय राहील. तसेच दि.01.07.2017 पासून रू.47100/– दि.01.07.2018 पासून रू.48500/–,दि.01.07.2019 पासून रू.50000/–प्रमाणे वेतन घेतील.

वरीलप्रमाणे करण्यात आलेल्या वेतननिश्चितीमुळे देय होणारी थकबाकी प्रदान करण्याची कार्यवाही, ही महाराष्ट्र नागरी सेवा (सुधारित वेतन) नियम–2019 व शासन अधिसूचना वित विभाग क्रमांक वेपूर 2019/प्र.क्र.1/सेवा–9, दि.30 जानेवारी 2019 मधील नियम क्रमांक 14 मधील तरतुदीनुसार करण्यात यावी. सदरच्या वेतननिश्चितीमध्ये वेतन पडताळणीचे वेळी काही विसंगती आढळून आल्यास किंवा अतिप्रदान झाल्याचे निदर्शनास आल्यास अतिप्रदानाची वसुली भविष्यात प्रदान करण्यात येणाऱ्या कोणत्याही रकमेतून वसुल करण्यात येईल.

# भाग ५ - शिक्षा/ निलंबन / सेवानिवृत्ती

क्र:डिपी/३१-बी-२/सफौ-६११-मेश्राम/अंआ/ 7352 २०२०/ यवतमाळ दि. 07 SEP 2020

वाचा :- या कार्यालयाचे अंतिम आदेश क्र. डिपी/३१-बी/सपोनि पुंडगे+४/अं.आ/१११४३/२०१९ यवतमाळ दि. २५/०९/२०१९

## अंतिम आदेश

कसूरदार :- पोहवा/६११ सुरेश मेश्राम, नेमणुक पो.स्टे. अवधुतवाडी

कसुरी :-

आपण पो.स्टे. अवधुतवाडी येथे नेमणुकीस असतांना आपणाकडे तपासावार असलेल्या खालील गुन्हयांचा निपटारा न करता व ठाणेदार यांनी दिलेल्या आदेशाकडे जाणुनबुजुन दुर्लक्ष करुन गुन्हे दिर्घकाळापासुन तपासावर प्रलंबित ठेवुन आपले कर्तव्यात कसुरी केली आहे.

| | | |
|---|---|---|
| ४. पोहवा/६११ मेश्राम | अप क्र. ३२६४/१४ कलम १३५ मुपोका | दि. १०/०५/२०१४ |
| | अप क्र. ३११/१७ कलम १२ अ मुंजका | दि. २८/०३/२०१७ |

उपरोक्त प्रकरणी कर्तव्यामध्ये हलगर्जीपणा, निष्काळजीपणा, बेजबाबदारपणाचे कसुरी बाबत आपणांस दिनांक ०२/०७/२०१८ रोजी " १ (एक) वर्ष वेतनवाढ स्थगिती " (परिणामकारक) या प्रस्तावित शिक्षेची कारणे दाखवा नोटीस देण्यात आली आहे. आपण का.दा.नो स्विकारली व आपले स्पष्टिकरण सादर केले नसल्याने या कार्यालयाचे आदेश क्र. डिपी/३१-बी-२/सपोनि पुंडगे+४/अं.आ/१११४३/२०१९ दिनांक २५/०९/२०१९ अन्वये" १ (एक) वर्ष वेतनवाढ स्थगिती " (परिणामकारक) अंतिम आदेश पारीत करण्यात आले आहे.

आपण दिनांक २२/०७/२०२० रोजी पुन:श्च शिक्षा माफ होणेबाबत विनंती अर्ज सादर केल्याने, सदर विनंती अर्जामधील स्पष्टिकरणाचे अवलोकन केले असता स्पष्टिकरण काही प्रमाणात संयुक्तीक असल्याने, सदर अंतिम आदेशातील शिक्षे मध्ये बदल करण्यात येवुन, तसेच अशा प्रकारची पुनरावृत्ती पुन्हा होणार नाही या अटीवर शिक्षेमध्ये अंशत: बदल करुन खालील प्रमाणे फेरबदल अंतिम आदेश पारीत करण्यात येत आहे.

## आदेश

मी पोलीस अधिक्षक यवतमाळ याव्दारे पोहवा/६११ सुरेश मेश्राम, यांना त्यांच्या उपरोक्त कसुरीबाबत " रु. ५०००/-" (पाच हजार ) आर्थीक दंडाची शिक्षा देत आहे.

आपण सदर शिक्षेने व्यथीत होत असतील तर सदर आदेश मिळाल्याच्या दिनांकापासुन ६० दिवसांचे आंत मा.विशेष पोलीस महानिरीक्षक अमरावती परीक्षेत्र अमरावती यांचेकडे अपील अर्ज आमच्या मार्फतीने दोन प्रतित सादर करु शकता.

(एम.राज कुमार)
पोलीस अधिक्षक ,यवतमाळ

क्रमांक : डीपी/३१-बी-२/सफौ-१५०+२/अं.आ/ 7359 /२०२० यवतमाळ दि:- 07 SEP 2020

अंतिम आदेश

कसूरदार :- १. स.पो.उप.नि/१५० प्रेमसिंग चव्हाण

२. पोहवा/१७१५ श्रावण दाढे ३. नापोकॉ/२४५ निवृत्ती कुळसंगे सर्व नेमणुक पो.स्टे.दारव्हा

कसूरी :-

आपण पो.स्टे. दारव्हा येथे नेमणुकीस आहात आपणास उप.वि.पो.अ. दारव्हा यांनी वारंवार अवैध धंद्यावर आळा घालण्यासाठी पो.स्टे. दारव्हा हद्दीतील संपूर्ण अवैध धंदे यांचेवर प्रभाविपणे कार्यवाही करुन, संपुर्ण अवैध धंदे बंद करणेबाबत सूचना दिल्या असता व आपणासोबत याबाबत पत्र व्यवहार करुन, सुध्दा आपण उप.वि.पो.अ. दारव्हा यांचे आदेशाचे पालन न करता हेतुपुरस्पर दुर्लक्ष करुन जाणीवपुर्वक स्वत:चे आर्थीक फायद्याकरीता अवैध धंदे चालविणा-यांना अभय देवून, अवैध धंदे पुर्ववत सुरुच ठेवले.

दिनांक २१/०२/२०२० रोजी उप.वि.पो.अ. यांना मिळालेल्या माहिती प्रमाणे त्यांचे विशेष पथक कर्मचारी यांना रवाना करुन, पो.स्टे. दारव्हा हद्दीतील स्थानिक गवळीपुरा दारव्हा येथे अवैध धंद्यावर छापा टाकुन रेड कार्यवाही करुन, मटका जुगार १०,०७० रु. (दहा हजार सत्तर रुपये) खेळतांना आरोपी यांना पकडले सदर आरोपी विरुध्द पो.स्टे. दारव्हा अप.क्र. १८३/२०२० कलम १२ (अ) मू.ज.का सहकलम १०९ भा.द.वि. अन्वये कार्यवाही करण्यात आली आहे. तसेच यापुर्वी दिनांक २५/०२/२०२० रोजी उप.वि.पो.अ यांना मिळालेल्या माहिती प्रमाणे त्यांचे विशेष पथक कर्मचारी यांना रवाना करुन, पो.स्टे. दारव्हा हद्दीतील ग्राम करजगाव दारव्हा येथे अवैध धंद्यावर छापा टाकुन, रेड कार्यवाही करुन, मटका जुगार १२,६२० रु. (बारा हजार सहाशे विस रुपय) खेळतांना आरोपी पकडले व त्यांचे विरुध्द पो.स्टे. दारव्हा अप क्र. १९६/२०२० कलम १२ (अ) मू.जू.का अन्वये कार्यवाही केली आहे.

उपरोक्त विषयासंबधी अवैध धंद्याबाबत दिनांक २५/०२/२०२० रोजी उप.वि.पो.अ यांनी खुलासा सादर करणे संबंधी लेखी पत्रव्यवहार करुन सुध्दा आपण आजपावेतो खुलासा सादर केला नाही. यावरुन असे दिसुन येते की, उप.वि.पो.अ. यांनी आपणांस वेळोवेळी गुन्हे बैठकीत तसेच मोबाईल फोनवरुन व लेखी आदेश देवुन, सुध्दा आपण उप.वि.पो.अ यांचे आदेशाकडे हेतुपुरस्पर दुर्लक्ष करुन स्वत :चे आर्थीक फायद्याकरीता अवैध धंदे चालविणा-यांना अभय दिल्याचे दिसुन येते.

प्रकरणी आपणांस कर्तव्यामध्ये हलगर्जीपणा, निष्काळजीपणा, बेजबाबदारपणा केल्याचे कसुरी बाबत क्र. पोअय/वि.चौ/स.पो.नि-सांगळे+३/कसुरी/५७२७/२०२० दिनांक १३/०७/२०२० अन्वये "१ (एक) वर्षे वेतनवाढ स्थगिती" (अपरिणामकारक) या शिक्षेची कारणे दाखवा नोटीस देण्यात आली आहे. आपण सदर कारणे दाखवा नोटीसचे स्पष्टिकरण सादर केले, सादर केलेले स्पष्टिकरण हे अशंत: समाधानकारक वाटल्याने, या करीता शिक्षेमध्ये अंशत: बदल करुन उपरोक्त कसुरीबाबत सक्त ताकीद देण्यात येत आहे. भविष्यात अशा प्रकारची पुनरावृत्ती पुन्हा होणार नाही. याची दक्षता घ्यावी.

(एम.राज कुमार)
पोलीस अधिक्षक,यवतमाळ

क्रमांक : डीपी/३१-बी-२/पो.उप.नि-पोटभरे/अं.आ/7355/२०२० यवतमाळ दि:- 7 SEP 2020

## अंतिम आदेश

कसूरदार :- पो.उप.नि/दिलीप पोटभरे, नेमणुक पो.स्टे. राळेगांव

कसूरी :-

आपण पो.स्टे. राळेगांव येथे नेमणुकीस आहात आपणास सन २०२० मध्ये दिनांक ०१/०३/२०२० पासुन आठवडा डाय-या तयार करुन उप.वि.पो.अ पांढरकवडा यांचे कार्यालयात सादर न केल्यामुळे उप.वि.पो.अ पांढरकवडा यांचे जावक क्र. १११८/२०२० दिनांक ०९/०४/२०२० अन्वये आठवडा डाय-या परीपुर्ण लिहुन आठवडा संपताच सादर करणेबाबत पत्र देण्यात आले तरी सुध्दा, आपण आठवडा डाय-या पाठविल्या नाही. आपणास उप.वि.पो.अ पांढरकवडा यांचे कार्यालयाचे जावक क्रमांक १५२०/२० दि. १२/०५/२०२० अन्वये कारणे दाखवा नोटीस दिली. कारणे दाखवा नोटीसचे स्पष्टिकरण आपण अद्याप पावेतो सादर केले नाही. त्यानंतर आपण दि. ०१/०३/२०२० पासुन ते दि. ३१/०५/२०२० पावेतो आठवडा डाय-या सादर केल्या नाही. आपण आठवडा डाय-या वेळेत सादर न केल्यामुळे, उप.वि.पो.अ. यांना आठवडा डायरीचे अवलोकन करुन आपले दैनंदिन कामकाजाचा आढावा घेऊन मार्गदर्शन करता आले नाही. यावरुन आपण वरीष्ठांचे आदेशाकडे जाणीवपुर्वक दुर्लक्ष करीत असल्याचे निदर्शनास येत आहे.

प्रकरणी आपणांस कर्तव्यामध्ये हलगर्जीपणा, निष्काळजीपणा, बेजबाबदारपणा केल्याचे कसुरी बाबत या कार्यालयाचे पत्र क्र. पोअय/वि.चौ/पो.उप.नि. दिलीप पोटभरे/कसुरी/५६६/२०२० दिनांक ०९/०७/२०२० अन्वये **"रु. ५०००/- (पाच हजार) " आर्थीक दंड** या शिक्षेची कारणे दाखवा नोटीस देण्यात आली आहे. आपण सदर कारणे दाखवा नोटीसचे स्पष्टिकरण सादर केले, आपण सादर केलेले स्पष्टिकरण हे अशंत: समाधानकारक वाटल्याने, देण्यात आलेल्या शिक्षेमध्ये अंशत: बदल करुन उपरोक्त कसुरीबाबत **सक्त ताकीद** देण्यात येत आहे. भविष्यात अशा प्रकारची पुनरावृत्ती पुन्हा होणार नाही. याची दक्षता घ्यावी.

(एम.राज कुमार)
पोलीस अधिक्षक,यवतमाळ

प्रति,

पो.उप.नि/दिलीप पोटभरे, नेमणुक पो.स्टे. राळेगांव

**मार्फत :- ठाणेदार पो.स्टे.राळेगांव**

२/- उपरोक्त आदेशाची मुळ प्रत संबंधीतांना अदा करुन दुय्यम प्रतिवर त्यांची दिनांकित स्वाक्षरी घेऊन ती दुय्यम प्रत या कार्यालयास सादर करावी.

प्रत :- अधिकारी आस्थापना लिपीक / डिपीजी लिपीक यांना माहिती व योग्य कार्यवाहीस्तव

# भाग ६ - प्रशिक्षण व इतर

७३२८

क्रमांक : पोअय/पलि-७/परवानगी-मालमत्ता/ ७३२८ /२०२०, यवतमाळ,दि. 7 SEP 2020

## आदेश

खालीलप्रमाणे नमूद पोलीस कर्मचारी यांना त्यांनी केलेल्या विनंती अर्ज तसेच सादर केलेल्या कागदपत्राच्या आधारे त्यांचे नावासमोर दर्शिविल्याप्रमाणे खालीलप्रमाणे नमूद मालमत्ता घेण्याकरीता महाराष्ट्र नागरी सेवा १९७९ नियम क्रमांक १९ (२) (३) अन्वये परवानगी देण्यात येत आहे.

| अ.क्र | पोलीस कर्मचारी यांचे नाव व पदनाम | पैशाचे विनीयोजन | ज्यासाठी परवानगी मिळणेबाबत अर्ज केला आहे त्याचे विवरण |
|---|---|---|---|
| १ | नापोकॉ/२०८३ शाम रमेशराव मेहसरे, नेमणूक पोस्टे दारव्हा | १. सोबत जोडलेल्या स्टेटमेंट नूसार स्वताचे वेतनातील बचतीमधून | श्री.मुकेश विठठलदास चांडक यांचे मालकी हक्काचा मौजा काळी कारंजा ता.कारंजा जि.वाशिम येथील गट क्र.१८४/८७ मधील १६५ चौमी क्षेत्रफळ असलेला प्लॉट रू.३२००००/- मध्ये विकत घेण्याची परवानगी मिळणेबाबत |
| २. | पोहेकॉ/१७३२ विलास जेता राठोड, पोस्टे महागाव | १.शेतीतील उत्पन्नातून<br>२.स्वताची बचत | चारचाकी विकत घेण्याची परवानगी |

(सदरची परवानगी हि कर्मचारी यांनी सादर केलेल्या कागदपत्राचे अधीन राहून देण्यात येत असून , भविष्यात सदरची कागदपत्रे हि खोटी आढळल्यास व कार्यालयाची दिशाभूल केल्याचे निदर्शनास आल्यास परवानगी रद्द करण्यात येऊन अर्जदाराविरूदध नियमानूसार कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी)

(मा.पोलीस अधीक्षक यांचे मान्यतेने)

(सुशिला पवार)
प्र.कार्यालय अधीक्षक
पोलीस अधीक्षक, यवतमाळ करीता

प्रति,

१.नापोकॉ/२०८३ शाम रमेशराव मेहसरे, नेमणूक पोस्टे दारव्हा
२.पोहेकॉ/१७३२ विलास जेता राठोड, पोस्टे महागाव
मार्फत :- प्रभारी अधिकारी पोस्टे दारव्हा/महागाव
सदरची प्रत संबधीतास अदा करून पोच या कार्यालयास सादर करावी

प्रत :- डिपीजी लिपीक

प्रत :- सआली ०४ व ०५ व नोंदणी लिपीक यांना सेवापटात नोंदी करीता